## आदेश निशाणी कमांक २९ वर

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरूस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, त्यांनी प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी दाखल केला आहे. सदर दाव्याचे कामकाज चालु असतांना प्रतिवादी क्रमांक १ ते ६ यांनी गट कमांक ६९ ही दावा मिळकत नोंदणीकृत खरेदीखताने दिनांक २६.०८.२०१४ रोजी विक्री केली आहे. वादींची अशी तक्रार आहे की दावा मिळकतीतील त्यांचे कायदेशीर हक्क डावलण्यासाठी जाणीवपुर्वक व्यवहार केला आहे. त्यामुळे सदरचे खरेदीखत हे त्यांच्यावर बंधनकारक नाही अशी दाद मागणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे नविन खरेदीदारास नियोजित प्रतिवादी क्रमांक १८ म्हणुन दाव्यात सामिल करण्यासाठी व त्या अनुषंगाने दाव्यात दुरूस्ती करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुतच्या अर्जास म्हणणे दाखल करून हरकत नोंदविलेली आहे. प्रतिवादी यांची अशी तक्रार आहे की वादीचा अर्ज खरा, बरोबर व कायदेशीर नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खारीज करण्याची मागणी केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा मौजे करंजाड येथील गट क्रमांक ६९, ३८१ व ३६३ या शेतमिळकतीचे सरसनिरसमानाने वाटप होउन मिळकतीतील त्यांचा १/३ हिस्सा तुटक होउन मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादी याची अशी तक्रार आहे की दाव्याचे कामकाज प्रलंबित असतांना प्रतिवादी यांनी दावा मिळकत गट क्रमांक ६९ हे नियोजित प्रतिवादी क्रमांक १८यांना दिनांक २६.०८.२०१४ रोजी खरेदीखताने

विक्री केली आहे. याकामी वादी यांनी फेरफार नोंद क्रमांक २२१६ ची सत्य प्रत न्यायालयात दाखल केली आहे. सदर फेरफार नोंदचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की मौजे करंजाड येथील गट क्रमांक ६९ ही मिळकत प्रस्तुत प्रतिवादी क्रमांक १ ते ६ यांनी सौ. किरण प्रविण आहिरे यांना रक्कम रू. १६लाख एवढया मोबदल्यात खरेदीखताने विक्री केली आहे. त्यानुसार खरेदीदार म्हणजेच नियोजित प्रतिवादी क्रमांक १८ यांच्या नावाची नोंद दावा मिळकतीच्या हक्कपत्रात घेण्यात आली आहे. सदरचा व्यवहार हा दावा प्रलंबित असल्याने झालेला आहे. अशा परिस्थितीमध्ये सदर खरेदीखत हे वादीच्या हिस्यावर बंधनकारक नाही असे जाहिर होउण मिळण्यासाठी वादीने नियोजित दुरूस्ती करून मिळण्याची मागणी केली आहे. सदर मागणी ही बदललेल्या परिस्थितीमुळे रास्त आहे असे स्पष्ट होते.

५. याउपरही वादींना दाव्यात दुरूस्ती करण्यास परवानगी दिल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. किंबहुना प्रस्तुतचा दावा हा गुणवागुणवर निकाली काढण्यास मदतच होईल. करीता प्रस्तुतचा अर्ज हा मंजुर करण्यास पात्र आहे. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज हा मंजुर करयात येतो.

२. वादी यांनी १४ दिवसाचे आत दाव्यात दुरूस्ती करावी तसेच दुरूस्ती प्रत दाखल करावी.

दिनांकः १८.०७.२०१६

( प. घ. तापडिया )
सह दिवाणी न्यायाधीश क स्तर सटाणा